# प्रेसनोट

दि.०८/०७/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | संगमनेर शहर पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.६२७/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | संतोष बाबासाहेब शेलार, वय–४० वर्षे, तलाठी, सजा–कनोली, वर्ग–३, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर रा.इंदिरानगर, गल्ली नं.०९, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २५,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे जानेवारी २०२१ पासुन कनोली गावचे सरपंच म्हणून काम पाहत आहेत. ग्रामपंचयात कनोली शिवारात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजने अंतर्गत मंजुर असलेल्या घरकुल लाभर्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार मोफत ५ ब्रास वाळु वाटप सुरू करणेत आलेली आहे. सदर वाळु वाटप करणेसाठी ग्रामपंचायत पातळीवर वाळु वाहतुकीसाठी पाच ट्रॅक्टर वाहनांना व वाळु उपसा करण्यासाठी एक जेसीबी व एक फरांडी ट्रॅक्टरला तहसिलदार, संगमनेर यांनी मंजुरी दिलेली आहे. तहसिलदार, संगमनेर यांनी घरकुल लाभार्थ्यांना वाळु वाहतुक करण्यासाठी मंजुरी मिळालेल्या ट्रॅक्टर मध्ये यातील तक्रारदार यांचा मालकीचा एक ट्रॅक्टर आहे. दि.२/७/२०२५ रोजी तक्रारदार हे कनोली गावच्या शिवारातील प्रवरानदी पात्रातुन ट्रॅक्टरव्दारे वाळु वाहतुक करण्याचे कामकाज करीत असताना कनोली गावचे तलाठी संतोष शेलार हे तेथे आले त्यावेळी ते तक्रारदार यांना म्हणाले की तुमच्या वाहनांना तहसिलदार साहेबांनी घरकुल लाभार्थ्यांसाठी वाळु वाहतुक करण्याची परवानगी दिली आहे. परंतु तुम्ही सर्व वाळु वाहतुक करणा–या ट्रॅक्टर वाहनांचे मिळुन मला ३०,०००/– रूपये दया, नाही तर मी तुमच्यावर अवैधरित्या वाळु वाहतुक करीत असलेबाबत कारवाई करेल.<br>दि.०७/०७/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार व त्यांचे मित्र यांनी लोकसेवक संतोष शेलार,तलाठी कनोली यांची भेट घेतली असता सदर वेळी लोकसेवक शेलार तलाठी, तक्रारदार व त्यांचे मित्र यांच्यात वाळु उपसा ट्रॅक्टरच्या वाहतुकी संदर्भाने चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान तलाठी शेलार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून सदर लाच स्विकारण्यास संमती दर्शविली. त्यानंतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात हात घालुन लाचेची रक्कम काढुन लोकसेवक शेलार तलाठी यांच्या समोर धरली असता तलाठी शेलार यांनी पंचासमक्ष सदरची लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर